
# “सामाजिक सुरक्षा”
# योजना माहिती पुस्तिका







**सामाजिक सुरक्षा योजना माहिती पुस्तिका २०२२. मुंबई: भारत**

**संकलन: चेतन वाघ**

**आभार: राजू वंजारे, विक्की कागडा, सुरेश लुले, ललित बाबर, प्रीति आटे, अनुराधा नायर, कामिनी कापडिया, रेजनी पविथरन, प्रमोद कालेकर**

**संदर्भ:** · **सदरील योजनेची माहिती भारत सरकार व महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागाच्या योजनांमधून घेण्यात आली आहे.**
· **सामाजिक सुरक्षा व अर्थसहाय्य योजनासोबती,चेतन वाघ, रिसोर्स अँड सपोर्ट सेंटर फॉर डेव्हलपमेंट, २०२०**

W: www.yuvaindia.org

E: info@yuvaindia.org

@officialyuva

@officialyuva

yuvaindia84

@yuvaonline

officialyuva

officialyuva

**Published by**: YUVA (Youth for Unity and Voluntary Action) YUVA Centre, Sector 7, Plot 23, Kharghar, Navi Mumbai – 410210 (INDIA)

**Designed by:** Manoj Hodawadekar

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| प्रस्तावना | ४ |
| प्रधानमंत्री मातृ वंदना योजना (PMMVY) | ७ |
| जननी सुरक्षा योजना (JSY) | ९ |
| ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजना | ११ |
| बालसंगोपन योजना (सुधारित) | १३ |
| माझी कन्या भाग्यश्री | १६ |
| मिशन वात्सल्य योजना | २१ |
| अन्नसुरक्षा योजना | २६ |
| महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या योजना | ३० |
| महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना | ३३ |
| शरद पवार ग्राम समृद्धी योजना | ३५ |
| राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना | ३७ |
| महात्मा फुले जीवनदायी आरोग्य व प्रधानमंत्री आयुष्यमान भारत योजना | ४० |
| प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) | ४२ |
| शबरी आवास योजना (आदिवासी क्षेत्र) | ४४ |
| प्रधानमंत्री किसान सन्मान निधी | ४७ |
| आत्मा–कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा | ४९ |
| ऑनलाईन अर्ज करण्यासाठीची नोंदणीची प्रक्रिया | ५१ |
| युनिसेफ | ५४ |
| युवा एकता आणि स्वयंसेवी कृतीकरिता (युवा) | ५६ |

# प्रस्तावना

समाजातील दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी अस्तित्वात असलेली शासन संस्था विविध सामाजिक सुरक्षा योजनांची घोषणा करून त्यातून समाजातील विषमता दूर करण्याचा प्रयत्न करत असते. समाजातील विषमतेची दरी कमी करून नवीन विषमतामुक्त समाजाची निर्मिती करता येणे शक्य आहे. परंतु शासनाने वेळोवेळी जाहीर केलेल्या विविध योजनांचा लाभ प्रत्यक्ष लाभार्थ्याला मिळतोच असे नाही. त्यामध्ये अनेक अभ्यासातून दिसून आले आहे कि, लाभार्थ्याला नेमकी योजना काय आहे, ती कशी मिळवायची असते, त्यासाठी आवश्यक कागदपत्रे कोणती आहेत, किंवा त्या योजना मिळविण्यासाठी कोणाला भेटायचे या सारख्या माहितीच्या अभावातून योजनेचा लाभ मिळत नाही. सद्याच्या कोरोनाच्या काळात अनेक कुटुंबाना त्यात विशेषतः महिला, बालके, वृद्ध, दारिद्रय रेषेखालील, दुर्बल, वंचित घटकातील कुटुंबाना विविध आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. ज्यामध्ये कामावरून काढणे, किंवा नोकरी जाणे, किंवा तुटपुंज्या पगारावर काम करणे, यातून आर्षिक विषमता वाढत आहे, असे निष्कर्ष वेगवेगळ्या संस्थांनी केलेल्या अभ्यासातून समोर आलेले आहे.

युवा संस्थेने सुद्धा मार्च २०२० पासून कोविड १९च्या, गंभीर परिस्थितीमुळे वंचित आणि असुरक्षित घटकांच्यावर लक्ष केंद्रित केले व त्यातून वंचित घटकातील असुरक्षिततेचे स्वरूप स्पष्ट झाले. समाजातील दुर्बल घटकांच्यासमोर आलेल्या संकटाला प्रतिसाद म्हणून युवा संस्थेने मोठ्या प्रमाणात मदत केली. त्यामध्ये लॉकडाऊन दरम्यान हजारो लोकांना रेशन आणि शिजवलेले अन्न या स्वरूपात दिलासा देण्याचा प्रयत्न केला. तसेच ऑक्टोबर २०२१ पासून युवा संस्थेने शासनाच्या विविध सामाजिक व कल्याणकारी योजना सक्षम करण्यावर आणि कुटुंबांना वेगवेगळ्या शासनाद्वारे जाहीर केलेल्या योजनांचा लाभ मिळविता येईल त्यासाठी आवश्यक असलेली महत्वाची कागदपत्रे मिळवून देण्यासाठी **“सामाजिक सुरक्षा सुविधा केंद्राची”** निर्मिती केली.

**‘कोणीही मागे राहता कामा नये’** या भावनेने सर्वात उपेक्षित लोकांसाठीच्या शासनाच्या योजना शेवटच्या घटकांपर्यंत पोहचविणे, त्यामध्ये असुरक्षित व वंचित समूहातील लोकांना तसेच आणि अनौपचारिक कामगारांसाठी अनेक सामाजिक सुरक्षा प्रणाली प्रत्येक स्तरावर मजबूत केली जाऊ शकते, त्यासाठी शासनाच्या सोबत काम करणे महत्वाचे आहे.

सद्य परिस्थितीत युनिसेफ व युवा संस्थेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील तीन जिल्ह्यांमध्ये सामाजिक सुरक्षा योजनांची व्याप्ती वाढविण्याचे काम सुरु आहे. त्यामध्ये आदिवासी भागात अमरावती जिल्ह्यातील चिखलदरा, ग्रामीण भागासाठी कोल्हापूर जिल्ह्यातील कागल व शहरी भागासाठी रायगड जिल्ह्यातील पनवेल विभागाची निवड करण्यात आलेली आहे.

सामाजिक सुरक्षा योजना पुस्तिकेच्या माध्यमातून लाभार्थ्याला महिला व बालके, वृद्ध व ज्येष्ठ नागरिक, अन्न सुरक्षा, दुर्बल घटकातील व्यक्तिगत लाभार्थी, आणि अनौपचारिक घटकातील योजनेची माहिती तर मिळेलच, परंतु त्याचसोबत त्या योजनेचे स्वरूप, त्यासाठी कुठे अर्ज करायचे, एकदा अर्ज केल्यावर त्यावर कोणती प्रक्रिया होते, त्याला मंजुरी कोण देते यासारखी माहिती मिळणार आहे. त्याचसोबत सामाजिक सुविधा मार्गदर्शन केंदातून अर्ज भरून तो अर्ज शासकीय कार्यालयात दाखल करून त्याचा लाभ मिळेपर्यंत पाठपुरावा केला जाणार आहे. तसेच ओळख दर्शविणारे विविध ओळखपत्र जसे कि, आधार कार्ड, पॅनकार्ड, निवडणूक ओळखपत्र, ई-श्रम, हेल्थ आयडी या सारखे ओळखपत्र तयार करण्यासाठी मदत केली जाणार आहे. सोबतच योजना मिळविण्यासाठी अडचणींचा पहिला मुद्दा असतो तो म्हणजे त्या योजनेसाठी लागणारा अर्ज कुठे मिळेल, तर तो अर्ज सुद्धा नव्या स्वरुपात QR च्या माध्यमातून या पुस्तिकेमध्ये उपलब्ध करून देण्यात आला आहे. ही मार्गदर्शिका शासनाच्या विविध सामाजिक सुरक्षा योजनांची व्याप्ती वाढविण्यासाठी उपयुक्त ठरेल, ही आशा आहे.

योजनेसाठी लागणारे अर्ज बाजूला
दिलेला QR Code
स्कॅन करून मिळवता येतील.

# महिला व बालकांसाठीच्या योजना...










# प्रधानमंत्री मातृ वंदना योजना (PMMVY)

प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेंतर्गत दिनांक १ जानेवारी २०१७ रोजी किंवा नंतर गरोदर असणाऱ्या किंवा प्रसूत झालेल्या सर्व विवाहित महिलांना लागू असून योजनेमध्ये कुटुंबातील पहिल्या जिवंत अपत्यापर्यंत लाभार्थी महिलेस रु.५०००/- एवढी रक्कम तीन टप्प्यांमध्ये आधार संलग्न बँक खाते किंवा पोस्ट ऑफिसच्या खात्यामध्ये जमा केली जाते.

**पात्रता:**

- १ जानेवारी २०१७ रोजी किंवा नंतर गरोदर असणाऱ्या किंवा प्रसूत झालेल्या सर्व विवाहित महिलांच्यासाठी पहिल्या अपत्यासाठीच लागू आहे.
- दारिद्र्य रेषेखालील व वरील सर्व लाभार्थ्यांना योजना लागू आहे. सदर योजना नोकरदार महिलांना लागू नाही.
- नैसर्गिक गर्भपात झाल्यास किंवा मृत बालक जन्मल्यास त्या टप्प्या पुरताच लाभ एकदाच लागू राहील.

**लाभ:**

- योजनेचा पहिला हप्ता रु.१०००/- असून, लाभार्थ्याने गरोदरपणाची नोंद आर.सी.एच. पोर्टलमध्ये ए.एन.एम. यांच्याकडे मासिकपाळी चुकल्यानंतर १०० दिवसांच्या आत द्यावे लागते.
- योजनेचा दुसरा हप्ता रु.२०००/- असून, गरोदरपणाच्या ६ महिन्यात (१८० दिवस किमान एक प्रसवपूर्ण तपासणी होणे आवश्यक असते.)
- योजनेचा तिसरा हप्ता रु.२०००/- असून प्रसूतीनंतर बाळाच्या जन्माची नोंद, बी.सी. जी., ओ.पी.व्ही.(झिरो डोस) यांची एक मात्रा,

तसेच पेंटाव्हॅलेट,ओ.पी.व्ही. लसीच्या तीन मात्रा घेणे आवश्यक आहे.

- या व्यतिरिक्त जननी सुरक्षा योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना त्या योजनेच्या निकषानुसार अतिरिक्त लाभ देय राहील.

## कागदपत्रे:

- लाभार्थीने पहिला, दुसरा व तिसरा लाभ मिळविण्याकरिता लाभार्थीचे आधार कार्ड, पतीचे आधार कार्ड, बँकेच्या पहिल्या पानाची झेरॉक्स, बाळाच्या जन्माचा दाखला, माता बाल संरक्षण कार्ड इ. देणे आवश्यक आहे.

## अर्ज प्रक्रिया:

- गरोदर मातेचे ANM/ आशा वर्कर/ अंगणवाडी ताई  ह्या अर्ज भरून घेतात.
- त्यानंतर आलेला फॉर्म तपासून त्याची डेटा इंट्री PMMVY च्या डॅशबोर्ड वर केली जाते.
- डॅशबोर्ड फॉर्म भरून झाल्यावर तो फॉर्म CDPO/बालविकास प्रकल्प अधिकारी व मेडिकल ऑफिसर एका आठवड्याच्या आत त्यावर निर्णय घेतात.
- त्यानंतर हा फॉर्म राज्य नोडल अधिकारी ह्यांना पाठविला जातो. तेथे ह्या फॉर्म वर तीन दिवसांत निर्णय घेतला जातो.
- त्यानंतर लाभार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये अनुदानाची रक्कम वर्ग केली जाते. तिन्ही वेळेच्या हप्त्यासाठी हीच प्रक्रिया राबविली जाते.

## योजनेसाठी अर्ज कुठे करावा?:

या योजनेचा पात्र लाभार्थ्यांकडून विनाशुल्क विहित नमुन्यातील अर्ज ए.एन.एम. कडून स्वीकारला जातो. परिपूर्ण अर्ज आरोग्य केंद्रामार्फत वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे सादर करण्याची जबाबदारी ए.एन.एम. यांची असते.

# जननी सुरक्षा योजना (JSY)

राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील दारिद्रय रेषेखालील, अनुसूचित जाती व अनुसुचित जमातीच्या कुटुंबातील माता मृत्यू व अर्भक मृत्यूचे प्रमाण कमी करणे आणि या महिलांचे आरोग्य संस्थेत प्रसुतीचे प्रमाणात वाढ करणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. जेएसवाय लाभार्थीस शासकीय आरोग्य संस्थेत किंवा शासन मानांकित खाजगी आरोग्य संस्थेत प्रसुती करिता प्रवृत्त केले जाते. त्याचसोबत जेएसवाय लाभार्थीस बँकेत खाते उघडून देण्यासाठी मदत केली जाते.

## पात्रता

राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील दारिद्रय रेषेखालील, अनुसुचित जाती व जमाती या कुटुंबातील सर्व गरोदर महिलांना शासकीय व खाजगी मानांकित आरोग्य संस्थेतील कोणत्याही बाळंतपणानंतर लाभ देय आहे तर फक्त दारिद्रयरेषेखालील गरोदर महिलेला घरी बाळंतपणानंतर लाभ देय आहे.

## लाभ

- ग्रामीण भागातील जेएसवाय पात्र लाभार्थी जर शासकीय आरोग्य संस्था/ मानांकित खाजगी आरोग्य संस्थेत प्रसुत झाली तर तिला प्रसुतीच्या तारखेनंतर ७ दिवसांच्या आत रु. ७००/-  तर शहरी भागातील जेएसवाय पात्र लाभार्थीला रु. ६००/- लाभ बँक खात्यामध्ये परस्पर जमा होणाऱ्या धनादेशाव्दारे दिला जातो.
- ग्रामीण व शहरी भागातील फक्त दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील लाभार्थ्यांची प्रसुती घरी झाल्यास अशा लाभार्थ्यास रुपये ५००/- लाभ प्रसुतीच्या तारखेनंतर ७ दिवसांच्या आत बँक खात्यामध्ये परस्पर जमा होणाऱ्या धनादेशाव्दारे दिला जातो.

- जेएसवाय पात्र लाभार्थींची सिझेरियन शस्त्रक्रिया करणे आवश्यक असल्यास लाभार्थीस रुपये १५००/- लाभ बँक खात्यामध्ये परस्पर जमा होणाऱ्या धनादेशाव्दारे दिला जातो.
- तसेच पात्र लाभार्थीस प्रसुतीपूर्व तीन तपासणी, धनुर्वात प्रतिबंधक लसीकरण व लोहयुक्त गोळया मिळवून देण्यासाठी मदत केली जाते.

## कागदपत्रे:

रेशन कार्ड, आधार कार्ड, ग्राम पंचायतीचा दारिद्रय रेषेखालील कुटुंब असल्याचा दाखला, बँक खाते, जातीचा दाखला किंवा जात सिद्ध करणारा पुरावा व विहित नमुन्यातील जननी सुरक्षा योजनेचे कार्ड

## अर्ज प्रक्रिया:

- गरोदरपणात गरोदर मातेने वरील कागदपत्रे अंगणवाडी ताई/ आशा वर्कर किंवा एन.एन.एम. यांना द्यावे.
- एन.एन.एम. सदरील अर्जातील माहितीची सत्यता तपासून डॅशबोर्ड वर माहिती भरतात. त्यावर प्राथमिक आरोग्य केंद्राचे वेद्यकीय अधिकारी यांची मंजुरी असते.
- प्रसूतीपूर्व चार आठवड्यापूर्वी ANM व वैद्यकीय अधिकारी सर्व कागदपत्रांची पूर्तता करून घेतात व प्रसूतीच्या दिवशी देण्यात येणाऱ्या रक्कमेची तरतूद करतात.
- प्रसूतीच्या दिवशी पात्र लाभार्थ्यास पात्र रक्कमेचे हस्तांतरण दवाखान्यातच केले जाते.

## योजनेसाठी अर्ज कुठे करावा?

- विहीत नमुन्यातील जेएसवाय कार्ड सर्व आवश्यक माहिती ही गाव पातळीवर काम करणाऱ्या अंगणवाडी ताई/ आशा वर्कर किंवा एन.एन.एम. यांना द्यावी.
- लाभार्थ्याने नजीकच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात माहिती दिल्यावर तिथे उपलब्ध असणारे कर्मचारी गरोदर महिलेची माहिती भरून घेतात.



# ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजना

अनुसूचित क्षेत्रात आहारातील उष्मांक व प्रथिनांच्या कमतरतेमुळे कमी वजनाची बालके जन्माला येण्याचे प्रमाण जास्त आहे. स्त्रियांच्या गरोदरपणाच्या शेवटच्या तिमाहीमध्ये वजनवाढीचे प्रमाण कमी असल्याने याचा परिणाम बाळाच्या वजनावर होतो. शिवाय जन्मानंतर पहिले तीन महिने बालक पूर्णपणे मातेवर अवलंबून असल्याने या कालावधीत मातेचे आरोग्य चांगले राहणे आवश्यक आहे.

या पार्श्वभूमीवर शासनातर्फे अनुसूचित क्षेत्रांतर्गत अंगणवाडी आणि मिनी अंगणवाडी क्षेत्रातील सर्व गरोदर स्त्रिया आणि स्तनदा मातांना आहारातून उष्मांक व प्रथिनांची उपलब्धता होण्यासाठी भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम योजनेअंतर्गत एक वेळ चौरस आहार उपलब्ध करून देण्याच्या योजनेला मान्यता देण्यात आली आहे. राज्यातील १६ आदिवासी जिल्ह्यात ८५ एकात्मिक बाल विकास प्रकल्पांतर्गत ही योजना राबविण्यात येत आहे.

**पात्रता:**

अनुसूचित क्षेत्रातील अंगणवाडी कक्षेत येणाऱ्या सर्व गरोदर स्त्रिया आणि स्तनदा माता.

**लाभ:**

या योजनेनुसार गरोदर स्त्रियांना शेवटच्या तिमाहीत व स्तनदा मातांना बाळंतपणानंतर पहिल्या तिमाहीत याप्रमाणे सहा महिन्याच्या कालावधीत चौरस आहार देण्यात येतो. या योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या एक वेळच्या पूर्ण आहारामध्ये चपाती अथवा भाकरी, भात, कडधान्ये-डाळ, सोया दुध (साखरेसह), शेंगदाणा लाडू (साखरेसह), अंडी अथवा केळी अथवा नाचणी हलवा, फळे, हिरव्या पालेभाज्या,

खाद्यतेल, गुळ अथवा साखर, आयोडीनयुक्त मीठ, मसाला इत्यादींचा समावेश असतो

| दिवस | अन्न घटक 1 | अन्न घटक 2 | अन्न घटक 3 | अन्न घटक 4 | अन्न घटक 5 |
|---|---|---|---|---|---|
| सोमवार ते शुक्रवार | चपाती/ भाकरी | भात | डाळ, हिरवी पालेभाजी | अंडी/ पर्यायी अन्न घटक | शेंगदाणा लाडू |
| शनिवार | चपाती/ भाकरी | भात | डाळ, हिरवी पालेभाजी | अंडी/ पर्यायी अन्न घटक | सोया दुध |

### कागदपत्रे:

या योजनेचा लाभ घेण्यासाठी कोणतेही कागदपत्रे देण्याची आवश्यकता नाही, फक्त अंगणवाडी ही आदिवासी क्षेत्रातील असणे गरजेचे आहे.

### योजनेसाठी अर्ज कुठे करावा?

अनुसूचित क्षेत्रातील अंगणवाडी सेविका/ अंगणवाडी मदतनीसकडे याची नोंद करण्यात येईल. या साठी कोणतेही अर्ज नसून त्याची फक्त अंगणवाडी मधील रजिस्टर मध्ये नोंद करण्यात येईल.

### अंमलबजावणी यंत्रणा

ही योजना अंगणवाडी पातळीवर महिला सरपंच किंवा ग्रामपंचायत सदस्य (अनुसूचित जमाती) यांच्या अध्यक्षतेखाली आहार समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. या योजनेचे वेळोवळी त्रयस्थ संस्थेमार्फत मुल्यमापन करण्यात येते.



# बालसंगोपन योजना (सुधारित)

० ते १८ वयोगटातील अनाथ, निराश्रित, बेघर व अन्य प्रकारे आपत्तीत असलेले बालकांचे संस्थाबाह्य आणि कौटुंबिक वातावरणात संगोपन व्हावे यादृष्टीने बाल संगोपन योजना राबविण्यात येते. या उपक्रमातंर्गत ज्या मुलांचे पालक अनेक कारणांमुळे जसे की आजार (दिर्घकालीन आजार), मृत्यू, विभक्त होणे, किंवा एका पालकाने सोडून जाणे किंवा अन्य काही आपत्तीमुळे त्यांची काळजी घेण्यास असमर्थ असतात त्यांना तात्पुरते दुसरे कुटुंब उपलब्ध करून दिले जाते. कुटुंबाकडून काळजी घेतली जाणे हा प्रत्येक बालकाचा अधिकार असतो म्हणून जोपासना (फॉस्टर) कार्यक्रमातंर्गत मुलाला थोड्या कालावधीसाठी किंवा दिर्घकालावधीसाठी कुटुंब उपलब्ध करून दिले जाते.

याच योजनेचा विस्तार करताना कोविड१९ मुळे (Covid-19) आई-वडीलांचे छत्र हरपल्याने अनाथ झालेल्या बालकांना आधार देण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. या अनाथ बालकाच्या नावावर एकरकमी पाच लाख रुपयांची मुदत ठेव ठेवण्याचा, तसेच बालक सक्षम होईपर्यंत त्याचा बालसंगोपन योजनेतून खर्च उचलण्याचा महत्वपूर्ण निर्णय दिनांक २ जून २०२१ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

**पात्रता:**

| आधाराची गरज असलेली बालके/ कुटुंबात बालकांसाठी संकटाची परिस्थिती असलेले बालके | कोविड१९ मुळे अनाथ झालेल्या बालकांसाठी |
|---|---|
| • अनाथ किंवा ज्यांच्या पालकांचा पत्ता लागत नाही, व जी दत्तक घेणे शक्य होत नाही अशी | • या योजनेत १ मार्च २०२० रोजी व त्यानंतर कोरोना संसर्गामुळे दोन्ही पालक (आई व |

| | |
|---|---|
| • एक पालक असलेली व कुटुंब कलहमध्ये असलेली बालके, मृत्यू, घटस्फोट, विभक्तीकरण, परित्याग, अविवाहित मातृत्व, गंभीर आजार, पालक रुग्णालयात असणे, इ. कारणामुळे विघटीत झालेल्या व एक पालक असलेल्या कुटुंबातील बालके, कुष्ठरोग व जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांची बालके, एच आय व्ही ग्रस्त/ बाधित बालके, तीव्र मतीमंद/ multiple disability बालके, दोन्ही पालक अपंग आहेत अशी बालके.<br>• पालकांमधील तीव्र बेबनाव, अति हेटाळणी व दुर्लक्ष, न्यायालयीन किंवा पोलीस तक्रार प्रकरणात अशी अपवादात्मक परिस्थितीतील (crisis situation मधील ) बालके<br>• शाळेत न जाणारे बाल कामगार (कामगार विभागाने सुटका व प्रमाणित केलेले) | वडील) मृत्यू पावलेले, किंवा एका पालकाचा कोविड-19 मुळे व अन्य पालकांचा इतर कारणामुळे मृत्यू झाला असल्यास किंवा एका पालकाचा (१ मार्च २०२०) पुर्वीच मृत्यू झाला असेल आणि त्यानंतर एका पालकाचा कोविडमुळे मृत्यू झाला असल्यास अशी ० ते १८ वयोगटातील बालके |

## लाभ:

| आधाराची गरज असलेली बालके/ कुटुंबात बालकांसाठी संकटाची परिस्थिती असलेले बालके | कोविड१९ मुळे अनाथ झालेल्या बालकांसाठी |
|---|---|
| • दरमहा ११००/- मासिक अनुदान | • एकरकमी पाच लाख रुपये मुदत ठेव (वयाची २१ वर्षे पूर्ण झाल्यावर व्याजासह रक्कम मिळेल.)<br>• दरमहा ११००/- मासिक अनुदान<br>• वयाच्या १८व्या वर्षापर्यंत शिक्षणासाठी मदत |

**महत्वाचे:**

कोविड१९ मुळे कोणी बालक अनाथ झाल्यास बालकाचे संगोपन करण्यास कुटुंबातील कुणी इच्छूक नसल्यास, त्याला बालगृहात दाखल करण्यात येईल.

**कागदपत्रे:**

- बालकाचा जन्मदाखला, कुटुंबाचे रेशन कार्ड, आधार कार्ड, बँक खाते, पालकांचा मृत्यू दाखला (कोविड१९ मुळे अनाथ झालेल्या बालकांसाठी पालकांचा कोविडमुळे मृत्यू झाला आहे त्याबाबतचा पुरावे)

**योजनेसाठी अर्ज कुठे करावा?**

- विहीत नमुन्यातील अर्ज जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांच्याकडे अर्ज करावा लागतो, सदरील अर्ज हा तालुक्याच्या पातळीवर महिला व बालविकास अधिकारी यांच्याकडे सुद्धा जमा करू शकता.
- कोविड१९ मुळे अनाथ झालेल्या बालकांच्यासाठी तहसीलदार यांच्याकडे अर्ज जमा करावा लागतो.




# माझी कन्या भाग्यश्री योजना

मुलींच्या जन्माबाबत समाजामध्ये सकारात्मक विचार आणणे आणि मुलां इतका मुलींचा जन्मदर वाढविणे या उद्देशाने “बेटी बचाओ-बेटी पढाओ” या योजनेच्या धर्तीवरच मुलींचा जन्मदर वाढविणे, त्यांना शिक्षण देणे व बालविवाहास प्रतिबंध करण्यासाठी सध्या सुरु असलेली सुकन्या योजना विलीन करुन व “माझी कन्या भाग्यश्री” ही नवीन योजना सुरु करण्यात आली. ही योजना संपूर्ण राज्यात सर्व गटातील दारिद्रय रेषेखालील (BPL) कुटुंबात जन्मणाऱ्या तसेच दारिद्रय रेषेच्यावरील (APL) पांढरे रेशनकार्ड धारक कुटुंबात जन्मणाऱ्या प्रत्येक मुलीसाठी “सुकन्या” योजनेचे लाभ कायम ठेऊन त्या व्यतिरिक्त मुलीचा जन्म झाल्यापासून मुलगी 18 वर्षे होईपर्यंत अधिकचे लाभ देण्यासाठी या योजनेला शासनाने मंजुरी दिली आहे. या योजनेचा मुख्य उद्देश हा लिंग निवडीस प्रतिबंध करणे, बालिकेचा जन्मदर वाढविणे आणि मुलींच्या जीवनमानाच्या सुरक्षेबद्दल खात्री देणे हा आहे.

योजनेमध्ये पुढीलप्रमाणे दोन प्रकारचे लाभार्थ्यांना योजनेचे लाभ अनुज्ञेय आहेत.

| | |
|---|---|
| **प्रकार-१ चे लाभार्थी** | एकुलती एक मुलगी आहे व मातेने कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केले आहे. |
| **प्रकार-२ चे लाभार्थी** | एक मुलगी आहे आणि मातेने दुसऱ्या मुलीनंतर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केलेली आहे. अशा परिस्थितीत दोन्ही मुलींना प्रकार-२ चे लाभ देय राहतील. मात्र एक मुलगा व एक मुलगी अशी परिस्थिती असल्यास लाभ अनुज्ञेय राहणार नाहीत. |

**पात्रता**

- सदर योजना सर्व गटातील दारिद्रय रेषेखालील (BPL) (पिवळे व केशरी रेशनकार्डधारक) तसेच दारिद्रय रेषेच्यावरील (APL) (पांढरे रेशनकार्डधारक), परंतु ज्यांचे उत्पन्न ८ लाखांपेक्षा कमी आहे, अशा कुटुंबात जन्मणाच्या अपत्यांपैकी दोन मुलींना लागू असेल.
- सदर मुलीचे वडील किंवा आई महाराष्ट्र राज्याचे मूळ रहिवाशी असणे आवश्यक आहे.
- योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज करतांना बालिकेचे जन्म नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक राहील.
- विम्याचा लाभ घेताना मुलीचे वय १८ वर्ष पूर्ण होणे आवश्यक राहील व १८ वर्ष पूर्ण होईपर्यंत अविवाहित असणे आवश्यक राहील.
- दुसऱ्या प्रसुतीच्या वेळेस जर जुळ्या मुली झाल्या, तर त्या दोन्ही मुली प्रकार-२ प्रमाणे योजनेस पात्र असतील.
- एखाद्या परिवाराने अनाथ मुलीस दत्तक घेतले असेल तर सदर मुलीला त्यांची प्रथम मुलगी मानून या योजनेचा लाभ अनुज्ञेय राहील. परंतु सदर लाभ प्राप्त होण्यासाठी दत्तक मुलीचे वय ० ते ६ वर्ष (६ किंवा ६ वर्षांपेक्षा कमी) असावे.
- बालगृहातील अनाथ मुलींसाठी ही योजना अनुज्ञेय राहील.
- प्रकार-१ च्या लाभार्थी कुटुंबास एका मुलीनंतर दोन वर्षाच्या आत व प्रकार-२ च्या लाभार्थी कुटुंबास दोन अपत्यांच्या जन्मानंतर एका वर्षाच्या आत कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करणे बंधनकारक राहील.

| अ.क्र. | पात्र लाभार्थी | शासनाकडून गुंतवणूक करण्यात येणारी रक्कम | इतर तपशील |
|---|---|---|---|
| १ | प्रकार-१ चे लाभार्थी | मुलीच्या नावे रु.५००००/- बँक ऑफ महाराष्ट्र मध्ये गुंतवणूक | १. रु. ५००००/- रुपये सहा वर्षासाठी गुंतवणूक केले जाते व मुलीच्या वयाची सहा वर्ष पूर्ण झाल्यावर त्यावरील व्याज काढता येते.<br>२. पुन्हा मुद्दल रु. ५००००/- रुपये सहा वर्षासाठी गुंतवणूक केले जाते व मुलीच्या वयाची बारा वर्ष पूर्ण झाल्यावर त्यावरील व्याज काढता येते.<br>३. पुन्हा मुद्दल रु. ५००००/- रुपये सहा वर्षासाठी गुंतवणूक केले जाते व मुलीच्या वयाची अठरा वर्ष पूर्ण झाल्यावर त्यावरील व्याज आणि मुद्दल अशी रक्कम काढता येते. |
| २ | प्रकार-२ चे लाभार्थी | दोन्ही मुलीच्या नावे प्रत्येकी रु.२५०००/- बँक ऑफ महाराष्ट्र मध्ये गुंतवणूक | १. रु.२५०००/- रुपये सहा वर्षासाठी गुंतवणूक केले जाते व मुलीच्या वयाची सहा वर्ष पूर्ण झाल्यावर त्यावरील व्याज काढता येते.<br>२. पुन्हा मुद्दल रु. रु.२५०००/- रुपये सहा वर्षासाठी गुंतवणूक केले जाते व मुलीच्या वयाची बारा वर्ष पूर्ण झाल्यावर त्यावरील व्याज काढता येते.<br>३. पुन्हा मुद्दल रु. रु.२५०००/- रुपये सहा वर्षासाठी गुंतवणूक केले जाते व मुलीच्या वयाची अठरा वर्ष पूर्ण झाल्यावर त्यावरील व्याज आणि मुद्दल अशी रक्कम काढता येते. |

## योजनेसाठीची कागदपत्रे:

- लाभार्थी कुटुंबाने प्रकार-१ चा लाभ घ्यावयाचा असल्यास पहिल्या अपत्याच्या (मुलगी) जन्मानंतर दोन वर्षाच्या आत कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केली असल्याबाबतचे प्रमाणपत्र, तसेच दुसरे अपत्य असलेल्या मुलीसाठी अर्ज करतांना एक वर्षाच्या आत कुटुंबनियोजन शस्त्रकिया केली असल्याबाबतचे वैद्यकीय अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र,

- अर्जासोबत आई किंवा वडील यांचे महाराष्ट्र राज्याचे मूळ रहिवाशी असल्याचा पुरावा (अधिवास प्रमाणपत्र)
- आई व वडिलांचे आधार कार्ड
- लाभार्थी मुलीचे आधार कार्ड
- मुलीचा जन्म नोंदणी प्रमाणपत्र,
- आई व मुलीचा नावाने बँक ऑफ महाराष्ट्र मध्ये जनधन बँक खाते,
- रेशन कार्ड
- ८ लाख रुपयांच्या आत उत्पन्न असल्याबाबतचे उत्पन्नाचा दाखला

**अर्ज प्रक्रिया:**

१. सदरील अर्जातील माहिती व लागणारी कागदपत्रे अंगणवाडी सेविकेकडे जमा करावी.

२. अर्जाची छाननी अंगणवाडी सेविकेने करून तो अर्ज पर्यवेक्षिका/ मुख्यसेविकेकडे सादर केला जातो.

३. अंगणवाडी पर्यवेक्षिका/ मुख्यसेविका सदर अर्जाची व प्रमाणात्रांची तपासणी करुन प्रत्येक महिन्याला नागरी प्रकल्पाबाबत बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्यांना व ग्रामीण प्रकल्पाबाबत ग्रामीण बाल विकास प्रकल्पमार्फत उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण), जिल्हा परिषद, यांना एकत्रित यादी मान्यतेसाठी सादर करतात.

४. संबंधित बाल विकास प्रकल्प अधिकारी व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) हे ऐच्छिकरित्या जास्त संख्या असलेल्या एखाद्या वस्तीची तपासणी करतील व त्यांची खात्री झाल्यानंतर लाभार्थी यादीला मान्यता देतील.

५. दत्तक मुलींच्या बाबतीत ६ वर्षांपर्यंतच्या विहित मुदतीपर्यंत अर्ज स्वीकारले जातात. अर्ज संपूर्ण भरलेला नसल्यास अथवा सर्व प्रमाणपत्रासह नसल्यास अर्ज मिळाल्यापासून १५ दिवसाच्या आत अर्जदारास कळविले जाते. अर्जदारांनी अपूर्ण भरलेले अर्ज किंवा आवश्यक ती कागदपत्रे जोडलेली नसल्यास अशा अर्जदारांना वरील मुदती व्यतिरिक्त वाढीव एक महिन्याची मुदत देण्यात येते.

मात्र कोणत्याही परिस्थितीत कोणताही अर्ज २ महिन्यांपेक्षा अधिक काळ प्रलंबित ठेवता येत नाही.

६. सदर अर्ज प्राप्त झाल्यावर ३० दिवसांच्या आत (अपवादात्मक परिस्थितीत ६० दिवसांच्या आत) पडताळणी करुन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी/ बाल विकास प्रकल्प अधिकारी/ उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) हे संबंधित विभागातील आयुर्विमा महामंडळाच्या कार्यालयाशी प्रपत्र - 'क' येथील विहित नमुन्यात माहिती भरून संपर्क साधतात.

## योजनेसाठी अर्ज कुठे करावा?:

- सदर योजनेअंतर्गत लाभाकरिता मुलीच्या पालकांनी मुलीचा जन्म झाल्यावर संबंधित ग्रामपंचायत/ नगरपालिका/ महानगरपालिका या ठिकाणी मुलीच्या नावाची नोंदणी केल्यानंतर त्या क्षेत्रातील अंगणवाडी सेविकेकडे प्रपत्र-'अ' किंवा 'ब' मध्ये अर्ज सादर करावा.
- सदर योजनेसाठी आवश्यक असलेले सर्व अर्ज राज्यातील प्रत्येक ग्रामीण व नागरी बाल विकास प्रकल्प अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण), जिल्हा परिषद, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, विभागीय उपायुक्त (महिला व बाल विकास) यांचे कार्यालयात विनामुल्य उपलब्ध असतात.
- मुलीचा जन्म झाल्यावर तिचे नांव नोंदविल्यावर त्या क्षेत्रातील अंगणवाडी सेविका/ मुख्य सेविका/ बाल विकास प्रकल्प अधिकारी महिला व बाल विकास विभागांतर्गत संस्थांच्या बाबतीत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेकडे अर्ज करता येईल.




# मिशन वात्सल्य योजना

कोविड-१९ या संसर्गजन्य आजाराचा प्रादुर्भाव मागील मार्च २०२० पासून राज्यात मोठ्या प्रमाणात सुरु आहे. कोविड-१९ महामारीच्या पहिल्या व दुसऱ्या लाटेमध्ये राज्यातील अनेक नागरिकांचे निधन झाले. अनेक ठिकाणी एकाच कुटुंबातील आई आणि वडील अशा दोन्ही पालकांचे निधन झाल्याने ० ते १८ वयोगटातील बालके अनाथ झाली आहेत. तर घरातील कर्त्या पुरुषाचे निधन होऊन अनेक महिला एकल/ विधवा झालेल्या आहेत. कोविड-१९ मुळे दोन्ही पालक गमावलेल्या बालकाना त्यांचे हक्क मिळवुन देऊन त्यांचे यथायोग्य संगोपन करणे तसेच घरातील कर्त्या पुरुषाचे निधन होऊन एकल/ विधवा महिलांचे योग्य पुनर्वसन करून त्यांचा आर्थिक व सामाजिक विकास साधून भविष्याविषयी त्यांना आश्वस्त करणे आणि त्याना समाजात मानाचे स्थान प्राप्त करून देणे ही शासनाची जबाबदारी आहे.

एकल/ विधवा असलेल्या महिलांचा शासकीय कार्यालयाशी संपर्क येत नसल्यामुळे त्या शासकीय योजना व कार्यपद्धती याबाबत अनभिज्ञ असतात त्यामुळे शासकीय योजनांपासून अशा महिला अनाथ बालके वंचित राहण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे एकल विधवा महिला आणि अनाथ बालके यांच्या कुटुंबियांना प्रत्यक्ष भेट देऊन त्यांच्या पुनर्वसनासाठी शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांचा आवश्यक प्रमाणपत्रांची पूर्तता करून त्यांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यासाठी "शासन आपल्या दारी" या संकल्पनेवर आधारित "मिशन वात्सल्य" ही योजना राबविण्यात येत आहे.

"मिशन वात्सल्य" या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी तालुकास्तरीय समन्वय समिती गठीत करण्यात आली आहे. सदरील समिती खालील योजनांच्या व विभागाचा समन्वय करून देण्यास मदत करतात.

| # | योजनेचे नाव | विभाग/ अधिकारी | समन्वय समितीची जबादारी |
|---|---|---|---|
| १ | **कुटुंब निवृत्तीवेतन योजना** | तहसीलदार | मृत शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या पत्नी व त्यांचे पाल्य कुटुंब निवृत्तीवेतानास पात्र असल्यास त्याना योजनेचा लाभ मिळवून देणे. |
| २ | **शिधापत्रिका** | बालविकास प्रकल्प अधिकारी(ग्रामीण व नागरी)/ तहसीलदार | एकल/ विधवा महिलांना व त्यांच्या पाल्यांना शिधापत्रिका मिळवून देण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणे. |
| ३ | **वारस प्रमाणपत्र** | विधी सेवा प्राधिकरण/ जिल्हा महिला व बालविकास अधिकारी/ तहसीलदार | एकल/ विधवा महिला व अनाथ बालक यांना Guardians and Wards Act नुसार त्यांचे न्याय हक्क अबाधित राहण्याच्या दृष्टीकोनातून आवश्यक प्रमाणपत्र व लाभ मिळवून देणे. |
| ४ | **LIC किंवा इतर विमा पॉलिसीचा लाभ** | बालविकास प्रकल्प अधिकारी/ तालुका संरक्षण अधिकारी(कनिष्ठ) | मृत व्यक्तीच्या कुटुंबांसोबत समन्वय साधून नामनिर्देशित व्यक्तीस विमा पॉलिसीचा लाभ मिळवून देणे. |
| ५ | **बँक खाते** | बालविकास प्रकल्प अधिकारी/ तालुका संरक्षण अधिकारी(कनिष्ठ) | पालकाच्या नावे खाते असल्यास नामनिर्देशित व्यक्ती कोण आहे ते तपासून नामनिर्देशित व्यक्तीस लाभ मिळवून देणे. |
| ६ | **आधार कार्ड** | बालविकास प्रकल्प अधिकारी/ तालुका संरक्षण अधिकारी(कनिष्ठ) | ज्या पाल्यांचा जन्माचा दाखला नसेल त्या करीता आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून जन्माचा दाखला बनवणे. |
| ७ | **जन्म/ मृत्यू दाखला** | गटविकास अधिकारी/ तहसीलदार | कोविड१९ मुळे व्यक्तीचा मृत्यू दाखला व अनाथ बालकांना त्यांचा जन्मदाखला प्राप्त करून देण्यास मदत करणे. |
| ८ | **जातीचे प्रमाणपत्र** | तहसीलदार,महसूल यंत्रणा | एकल/ विधवा महिलांना व अनाथ बालकांना जातीचे प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यास मदत करणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | **बाल संगोपन योजना** | बालविकास प्रकल्प अधिकारी | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून योजनेचा लाभ उपलब्ध करून देणे. |
| १० | **मालमत्ता विषयक हक्क** | विधी सेवा प्राधिकरण/ तहसीलदार | एकल/ विधवा महिला व अनाथ बालक यांना Gurdians and Wards Act नुसार त्यांचे मालमत्ता विषयक हक्क प्राप्त करून देणे. |
| ११ | **अनाथ बालकांचा शालेय प्रवेश व फी** | तालुका शिक्षणाधिकारी | ज्या बालकांचे शालेय प्रवेश झाले नाहीत त्याना तालुका शिक्षण अधिकारी यांनी जबाबदारी घेऊन त्यांचे प्रवेश निश्चित करणे. ज्याना फी संबंधी समस्या असेल त्याबाबतीमध्ये तालुका शिक्षण अधिकारी यांनी जिल्हास्तरावरील समिती बरोबर समन्वय साधून निर्णय घ्यावा. |
| १२ | **घरकुल** | गटविकास अधिकारी | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून सदर योजनेचा लाभ उपलब्ध करून देणे. |
| १३ | **कौशल्य विकास** | तंत्रशिक्षण अधिकारी | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून सदर योजनेचा लाभ उपलब्ध करून देणे. |
| १४ | **संजय गांधी निराधार योजना** | तहसीलदार/ बालविकास प्रकल्प अधिकारी | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून योजनेचा लाभ उपलब्ध करून देणे. |
| १५ | **राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना** | सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग/ तहसीलदार | जे पाल्य दारिद्रय रेषेखाली असतील त्या पाल्यांना कागदपत्रांची पूर्तता करून राष्ट्रीय कुटुंब लाभ योजनेचा लाभ मिळवून देणे. |
| १६ | **श्रावणबाळ योजना** | सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग/ तहसीलदार | जे पाल्य आजी-आजोबा यांचेकडे असतील तर त्या आजी आजोबांना श्रावण बाळ योजना लागू करून देणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| १७ | **इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन** | तहसीलदार | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून सदर योजनेचा लाभ उपलब्ध करून देणे. |
| १८ | **इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन** | तहसीलदार | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून सदर योजनेचा लाभ उपलब्ध करून देणे |
| १९ | **इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन** | तहसीलदार | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून सदर योजनेचा लाभ उपलब्ध करून देणे |
| २० | **शुभमंगल सामुहिक विवाह योजना** | बालविकास प्रकल्प अधिकारी | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून सदर योजनेचा लाभ उपलब्ध करून देणे |
| २१ | **अंत्योदय योजना** | तहसीलदार | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून सदर योजनेचा लाभ उपलब्ध करून देणे |
| २२ | **आदिवासी विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक योजना** | प्रकल्प अधिकारी, आदिवासीविकास विभाग | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून सदर योजनेचा लाभ उपलब्ध करून देणे |
| २३ | **कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक लाभाच्या योजना** | तालुका कृषी अधिकारी | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून सदर योजनेचा लाभ उपलब्ध करून देणे |

| | | | |
|---|---|---|---|
| २४ | **वरील योजनां व्यतिरिक्त तसेच स्वयंसेवी संस्थांमार्फत राबविण्यात येत असलेले उपक्रम** | बालविकास प्रकल्प अधिकारी/ तालुका संरक्षण अधिकारी(कनिष्ठ) | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून सदर योजनेचा लाभ उपलब्ध करून देणे |

## ग्रामस्तरीय/ वॉर्डस्तरीय पथक:

सदर योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी तालुका स्तरावर समन्वय समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समन्वय समितीमार्फत गाव पातळीवरील तलाठी, ग्रामसेवक, प्राथमिक शिक्षक, अंगणवाडी सेविका तसेच शहरी क्षेत्रातील वार्ड निहाय पथकामध्ये वॉर्ड अधिकारी, तलाठी, प्राथमिक शिक्षक, अंगणवाडी सेविका यांचा समावेश करण्यात आला आहे.

सदर प्रत्येकी गावातील/ शहरातील एकल/ विधवा महिला, अनाथ बालकांच्या कुटुंबाना भेट देऊन शासनाच्या विविध योजनंची माहिती देतील. तसेच विविध योजनांचा लाभ उपलब्ध व्हावा यासाठी आवश्यक कागदपत्रे प्राप्त करून योजनांच्या निकषाप्रमाणे परिपूर्ण प्रस्ताव तयार करून तो प्रस्ताव तालुकास्तरीय समन्वय समितीकडे सादर करतील.

## ग्रामस्तरीय/ वार्डस्तरीय पथकांची कर्तव्य व जबाबदाऱ्या:-

- गावपातळीवरील शहरी भागातील पथकाने कोरोना कालावधीत अनाथ झालेल्या बालकांच्या तसेच एकल/ विधवा महिलांच्या घरी भेट देणे.
- संबंधित पात्र लाभार्थ्यांची कागदपत्रांची पूर्तता करुन अर्ज भरणे.
- योजनांचे निकष तपासून परिपूर्ण प्रस्ताव तयार करणे व परिपूर्ण प्रस्ताव तालुकास्तरीय समितीस सादर करणे.

उपरोक्त योजना व्यतिरिक्त शासनाच्या इतर विभागांच्या वैयक्तिक लाभाच्या योजनासाठी एकल/ विधवा महिला अनाथ बालके पात्र असतील तर त्या योजनाचाही लाभ त्यांना मिळवून देणे बाबत तालुकास्तरीय समन्वय समितीचे समन्वय समितीचे सुद्धा काम असेल.



# अन्नसुरक्षा योजना

केंद्र शासनाने राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा संमत केला असून देशातील विविध राज्यात राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ च्या कायद्याची अंमलबजावणी दि. ५ जुलै २०१३ पासून झाली तर राज्यात या कायद्याची दि. १ फेब्रुवारी २०१४ पासून सुरु आहे. देशातील जवळपास ८१ कोटी जनतेस या कायद्यामुळे सवलतीच्या दरात अन्न धान्य मिळत आहे. राज्यातील ११.२३ कोटी जनतेपैकी सात कोटी जनतेला या योजनेअंर्तगत हक्काचे धान्य मिळत आहे.

सध्या नागरिकांना सार्वजनिक वितरण व्यवस्था अंतर्गत अंत्योदय/ बीपीएल/ केशरी/ अन्नपूर्णा व शुभ्र अशा वेगवेगळ्या शिधापत्रिका अस्तित्वात होत्या. अन्नसुरक्षा कायद्याची अंमलबजावणी करताना विविध प्रकारच्या शिधापत्रिका रद्द करुन प्राधान्य (अंत्योदय) आणि प्राधान्य (इतर) अशाच दोनच शिधापत्रिकाची वर्गवारी केली आहे. या शिधापत्रिकानुसार धान्याचे वितरण करण्यात येते.

नवीन शिधापत्रिका देताना त्यामध्ये अत्यंत महत्वाच्या असा बदल करण्यात आला असून या नवीन शिधापत्रिका आता कुटुंबातील महिलेला कुटुंब प्रमुख म्हणून गणण्यात येऊन त्या महिलेच्या नावाने तिचे छायाचित्र असलेले बारकोड असलेली शिधापत्रिका वितरीत करण्यात येते.

**पात्रता**

- बीपीएल चे सर्व लाभार्थी “प्राधान्य कुटुंब गटातील लाभार्थी” आहेत.
- प्राधान्य कुटुंब गटातील उर्वरित लाभार्थीसाठी ग्रामीण भागात रु.४४,000/- व शहरी भागात कमाल रु.५९,000/-पर्यंत वार्षिक उत्पन्न

असणाऱ्या एपीएल (केशरी) साठी लाभार्थ्यांचा सामावेश करण्यात येतो.

- अंत्योदय अन्न योजनेसाठी पिवळ्या शिधापत्रिकाधाराकातून पुढील घटकांची निवड करण्यात येते.
  - विधवा, दिव्यांग, दुर्धर आजारग्रस्त व ६० वर्षावरील कुटुंब प्रमुख असलेले कुटुंबे.
  - एकट्या रहात असलेल्या विधवा, अपंग, दुर्धर आजारग्रस्त व ६० वर्षावरील वृद्ध.
  - सर्व आदिम जमातीची कुटुंबे.
  - भूमिहीन शेतमजूर, अल्पभूधारक शेतकरी, ग्रामीण कारागीर तसेच कचऱ्यातील वस्तू गोळा करणारे, निराधार अशी शहरी आणि ग्रामीण भागातील व्यक्तींची कुटुंबाची निवड करण्यात येते.
  - एच.आय.व्ही./ एड्स बाधित नागरिकांना तसेच कुष्ठरोग्यांना प्राधान्य देण्यात येते.

## लाभ: कोणत्या कार्डावर काय मिळते?

| धान्य | अन्नपूर्णा कार्ड | अंत्योदय कार्ड | केशरी कार्ड | | पांढरे कार्ड |
|---|---|---|---|---|---|
| | | | (PHH) | (NPHH) | |
| गहू | ५ किलो मोफत | २० किलो रु.२/- दराने | प्रति व्यक्ती ३ किलो रु.२/- भावाने | - | - |
| तांदूळ | ५ किलो मोफत | १५ किलो रु.३/- दराने | प्रति व्यक्ती २ किलो रु.३/- भावाने | - | - |
| साखर | - | रु. २०.०० दराने | - | - | - |

**PHH:** ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न शहरी भागासाठी रु. ५९०००/- व ग्रामीण भागासाठी रु. ४४०००/- च्या आत आहे, अशी कुटुंबे प्रायोरिटी हाउस होल्ड म्हणजे प्राधान्यक्रम वर्गात समाविष्ट करण्यात आली आहेत.

**NPHH:** ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न शहरी भागासाठी रु. ५९०००/- व ग्रामीण भागासाठी रु. ४४०००/- च्या वर आहे, अशी कुटुंबे नॉन प्रायोरिटी हाउस होल्ड म्हणजे प्राधान्यक्रम नसलेल्या वर्गात समाविष्ट करण्यात आली आहेत.

## अन्नधान्य वितरणांची पद्धती

- बीपीएल (पिवळे कार्ड) व अंत्योदय योजनेच्या लाभार्थ्यांना दर महा ३५ किलो धान्य मिळते. अंतर्गत प्रमाणात बदल होऊ शकतो. (उदा. गहू २० किलो ऐवजी १५ किलो व तांदूळ १५ ऐवजी २० किलो).
- अन्नपूर्णा योजने अंतर्गत ६५ वर्षे किंवा त्यावरील निराधार स्त्री – पुरुष यांना दरमहा १० किलो धान्य मोफत देण्यात येते. योजनेच्या लाभार्थ्यांना एकूण १० किलो-अंतर्गत प्रमाणात बदल होऊ शकतो. (उदा. गहू ५ किलो ऐवजी २ किलो व तांदूळ ५ किलो ऐवजी ८ किलो)

# व्यक्तिगत लाभाच्या सामाजिक सुरक्षेच्या योजना...






# महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या योजना

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या कलम १८(१) नुसार प्रत्येक राज्याने कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. बांधकाम व इतर बांधकाम कामगार हे सर्वात मोठ्या असंघटित वर्गात येतात. कामगारांच्या रोजगार व सेवाशर्तीचे नियम करण्याच्या दृष्टीने, भारत सरकारने "इमारत व इतर बांधकाम कामगार" (रोजगार व सेवा शर्ती नियमन) कायदा १९९६ ची निर्मिती केली आहे. या कायद्यातंर्गत राज्य सरकारने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवा शर्तीचे नियमन) २००७ मंजूर करण्यात आला आहे.

## पात्रता

- १८ ते ६० वयोगटातील बांधकाम कामगार
- मागील बारा महिन्यांमध्ये ९० दिवसांपेक्षा जास्त दिवस बांधकाम कामगार म्हणून काम केलेले कामगार

**लाभ: महामंडळाच्या अंतर्गत येणाऱ्या विविध योजना**

| सामाजिक सुरक्षा योजनांचा तपशील | शैक्षणिक योजनांचा तपशील | आरोग्य विषयक योजनांचा तपशील | आर्थिक योजनांचा तपशील |
|---|---|---|---|
| १. पहिल्या विवाहाच्या प्रतिपूर्तीसाठी रु.३०,०००/-<br>२. मध्यान्ह भोजन योजना | १. दोन पाल्यांना १ली ते ७वी साठी प्रतिवर्षी रु.२५००/ आणि इ.८ वी ते १०वी साठी प्रति वर्षी रु.५०००/- | १. दोन जीवित अपत्यांपर्यंत नैसर्गिक प्रसूती साठी रु.१५,०००/- व शस्त्रक्रियेद्वारे प्रसूतीसाठी रु.२०,०००/ | १. कामगाराचा कामावर असतांना मृत्यू झाल्यास त्याच्या कायदेशीर वारसास रु.५ लक्ष |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. मानधन योजना, वक्तिमत्व विकास पुस्तक संचाचे वाटप<br>४. आवश्यक हत्यारे/ अवजारे खरेदीसाठी रु. ५०००/-<br>५. प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना<br>६. प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना<br>७. कौशल्य वृध्दीकरण योजना<br>८. सुरक्षा संच पुरविणे.<br>९. अत्यावश्यक संच पुरविणे. | २. दोन पाल्यांना इयत्ता १०वी व इयत्ता १२वी मध्ये ५०टक्के किंवा अधिक गुण मिळाल्यास रु.१००००/<br>३. दोन पाल्यांना ११वी व १२वीच्या शिक्षणासाठी प्रती शैक्षणिक वर्षी रु.१०,०००/-<br>४. दोन पाल्यांना अथवा कामगारांच्या पत्नीस पदवीच्या प्रथम, द्वितीय वर्षाच्या प्रवेश, पुस्तके व सामुग्रीसाठी प्रतिवर्षी रु.२०,०००/-<br>५. दोन पाल्यांना अथवा पुरुष कामगारांच्या पत्नीस वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमा करिता रु.१,००,००० व अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमा करिता रु.६०,०००/-<br>६. दोन पाल्यांना शासनमान्य पदविके करीता प्रतिवर्षी रु.२०,०००/- व पदव्युत्तर पदविके साठी रु.२५,०००/-<br>७. दोन पाल्यांना संगणकाचे शिक्षण MSCIT करिता शुल्काची प्रतिपूर्ती | २. लाभार्थी कामगार व त्यांच्या कुटुंबियांना गंभीर आजाराच्या उपचारार्थ रु.१,००,०००/- (आरोग्य विमा योजना लागू नसल्यास)<br>३. एका मुलीच्या जन्मानंतर पती/ पत्नीने कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया केल्यास त्या मुलीच्या नावे १८ वर्षांपर्यंत रु.१,००,०००/- मुदतठेव<br>४. ७५टक्के दिव्यांगत्व आल्यास रु.२,००,०००/-<br>५. महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना<br>६. व्यसन मुक्ती केंद्रांतर्गत उपचाराकरिता रु.६०००/- | २. कामगाराचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास रु.२ लक्ष<br>३. घरखरेदी किंवा घरबांधणी करिता बँकेकडून घेतलेल्या गृहकर्जावरील रु. ६ लक्ष पर्यंतच्या व्याजाची रक्कम अथवा रु.२ लक्ष अनुदान<br>४. प्रधानमंत्री आवास योजनेत पात्र नोंदीत बांधकाम कामगारांना मंडळामार्फत रु.२ लक्ष अनुदान<br>५. कामगाराचा मृत्यू झाल्यास अंत्यविधी करिता रु. १०,०००/-<br>६. कामगाराचा मृत्यू झाल्यास त्याच्या विधवा पत्नी अथवा स्त्री कामगाराच्या पतीस रु.२४,०००/- (५ वर्षाकरिता प्रतिवर्षी अर्ज करणे आवश्यक आहे) |

## योजनेसाठीची कागदपत्रे:

मंडळात नोंदणी करण्याकरिता फॉर्म भरुन खालीलप्रमाणे कागदपत्रे जोडून अर्ज सादर करावा लागतो.

- रहिवासी पुरावा (आधारकार्ड/पारपत्र/वाहनचालक परवाना/शिधापत्रिका/मागील महिन्याचे विद्युत देयक/ ग्रामपंचायतीचा दाखला यापैकी एक
- ९० दिवस सलग काम केल्याचे ग्रामपंचायत/ वॉर्ड ऑफिसर किंवा नोंदणीकृत कंत्राटदाराचे प्रमाणपत्र
- बँकेचे पासबुक
- वयाचा पुरावा
- पासपोर्ट आकाराचे तीन फोटो
- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे ओळखपत्र (जर नूतनीकरण असेल तर)
- नोंदणी फी रु.२५/- व पाच वर्षासाठी वार्षिक वर्गणी रु. १२/- प्रमाणे रु. ६०/- असे एकूण रु.८५/- रुपये

## नोंदणीची प्रक्रिया:

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या योजनेचा लाभ घेण्याकरिता www.mahabocw.in या वेबसाईटवर जाऊन ऑनलाईन नोंदणी करता येते. ऑनलाईन नोंदणी करणे शक्य नसल्यास सबंधित जिल्ह्याच्या कामगार कार्यालयात जाऊन कामगार नोंदणी करू शकतात. ऑनलाईन नोंदणीचा अर्ज तसेच विविध मंडळाच्या योजनांचे अर्जाचे नमुने मंडळाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहेत.

# महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना

केंद्रशासनाने देशात ग्रामीण मजुरांना अकुशल रोजगाराची हमी १९७७ पासून कायद्यान्वये देणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे. महाराष्ट्र रोजगार हमी योजना कायदा, त्याची यशस्वी अंमलबजावणीच्या सद्यस्थितीचा अभ्यास करून केंद्र शासनाने संपूर्ण देशात दिनांक ५ सप्टेंबर २००५ पासून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा लागू केला आहे.

**पात्रता:**

- वय वर्षे १८ ते ६० वयोगटातील अकुशल काम करण्यास तयार असणारे ग्रामीण भागातील महिला आणि पुरुष
- जॉबकार्डधारक असावा.
- व्यक्तिगत शेतीच्या कामासाठी शेतकऱ्याकडे आवश्यक शेतजमीन असणे आवश्यक असते.

**लाभ:**

- किमान १०० दिवसांचा रोजगार
- मनरेगांतर्गत मजूरी किमान वेतन कायद्यानुसार रु.२५६/- इतकी मिळते. (दरवर्षी महागाई निर्देशांकानुसार ठरलेले मूल्य) कामाच्या प्रमाणात कमी जास्त मजुरी मिळू शकते.
- कामाच्या ठिकाणी पिण्याचे पाणी, प्रथमोपचार, कामाच्या जागी तात्पुरत्या स्वरुपाची शेड निवारा, मजुरांच्या ६ वर्षाखालील बालकांना सांभाळण्यासाठी कामाच्या ठिकाणी दाईची नेमणूक इत्यादी सुविधा
- अकुशल रोजगार उपलब्ध न झाल्यास दैनिक मजुरीच्या २५ टक्के बेरोजगार भत्ता

- गावापासून ५ कि.मी.चे अंतराच्या आत काम, गावापासून ५ किमी पेक्षा जास्त अंतरावरील रोजगार दिल्यास १० टक्के जास्त मजुरी.
- कामाच्या अनुषंगाने मजुराबरोबर आलेल्या लहान मुलास दुखापत झाल्यास रुग्णास सर्व रुग्ण सेवा शासकीय खर्चाने व मजुरीच्या ५० टक्के पर्यंत सानुग्रह रुग्ण भत्ता
- अपघातात एखादा मजुराचा मृत्यू झाल्यास रु.५००००/- किंवा कायमचे दिव्यांगत्व आल्यास त्याच्या वारसास रु.२५०००/- इतके अनुदान
- स्त्रियांकरीता प्रसूती रजेची तरतूद
- मनरेगा अंतर्गत काम करणाऱ्या मजुरांना इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या योजनांचा लाभ

**मनरेगा अंतर्गत घेतली जाणारी कामे:**

जल संधारण, जलसंवर्धनाची कामे किंवा दुष्काळ प्रतिबंधक, वनीकरण, सिंचन विहिरी, सार्वजनिक विहिरी, सिमेंट रस्ते, पाणंद रस्ते, इंदिरा आवास, शौचालये, शौषखड्डे, रोपवाटिका, नॅडेप खड्डे, तुती लागवड, विहीर पुनर्भरण, गांडूळ खतनिर्मित त्याचसोबत अकुशल मजुरांना रोजगार पुरविणारी व ग्रामीण विकासाला पूरक कामे

**कागदपत्रे:**

- कामाची मागणी करणारा नमुना क्र.४चा अर्ज
- मनरेगा जॉबकार्ड (जॉबकार्ड नसल्यास आधारकार्ड, बँक पासबुक, रेशनकार्ड, रहिवाशी दाखला)

**प्रक्रिया अर्ज**

- ग्राम पंचायत कडे अर्ज जमा केल्यावर ग्राम पंचायत अर्जाच्या नुसार व नरेगा लेबर बजेट नुसार मजुरांना १५ दिवसाच्या आत काम उपलब्ध करून देते. जर ग्राम पंचायत कडे काम उपलब्ध नसल्यास इतर संस्थाच्या कडील कामाच्या प्लान नुसार काम उपलब्ध करतात.
- काम उपलब्ध नाही झाल्यास बेरोजगार भत्ता उपलब्ध करून देतात.

**अर्ज कुठे करावा?**

नरेगाच्या अंतर्गत काम करण्यासाठी अर्ज ग्राम पंचायत किंवा संबधित कामाच्या कार्यालयाच्या ठिकाणी करावा लागतो.



# शरद पवार ग्राम समृद्धी योजना

केंद्र शासनाने 2022 पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. याचाच भाग म्हणून राज्य सरकारने "मी समृध्द, तर गाव समृद्ध आणि गाव समृद्ध तर माझा महाराष्ट्र समृद्ध" या धोरणांतर्गत लखपती कुटुंब या संकल्पनेच्या आधारे मनरेगाच्या अंतर्गत व्यक्तिगत लाभाच्या योजनांच्या अभिसरणातून शरद पवार ग्राम समृद्धी योजना महाराष्ट्र राज्यात लागू करण्यात आली आहे.

| योजना स्वरूप | कशासाठी? | अट | लाभाचे स्वरूप |
|---|---|---|---|
| **गाय व म्हैस यांकरिता पक्का गोठा** | जनावरांच्या गोठ्यात चारा आणि खाद्यासाठी चांगली गव्हाण बांधणे तसेच मूत्र संचयनाकरिता टाकी बांधण्यासाठी अनुदान | • स्वत:ची गाय किंवा म्हैस<br>• लाभार्थ्याकडे स्वत:ची जमीन असावी लागते. | एका गोठ्यासाठी (२ ते ६ गुरे) अकुशल खर्च रु. ६,१८८/- व कुशल खर्च रु. ७१,१८८/- असे एकूण रु.७७,१८८/-<br>६च्या पटीत म्हणजे १२ गुरांसाठी दुप्पट आणि १८ गुरांपेक्षा जास्त गुरांसाठी ३ पट अनुदान |
| **शेळीपालन शेड** | शेळ्या-मेंढ्यासाठी चांगल्या प्रतीचे शेड बांधून वाया जाणारे मल, मुत्रशेतीमध्ये उत्कृष्ट सेंद्रिय खत करण्यासाठी अनुदान | • किमान २ शेळ्या असणारे भूमिहीन मजूर व शेतकरी<br>• लाभार्थ्याकडे स्वत:ची जमीन असावी लागते. | एका शेडसाठी (१० शेळ्यांकरिता) अकुशल खर्च रु. ४,२८४/- व कुशल खर्च रु. ४५,०००/- असे एकूण रु.४९,२८४/-<br>एका कुटुंबास जास्तीत जास्त ३० शेळ्यांकरिता ३ पट अनुदान मंजूर करण्यात येते. |

| | | | |
|---|---|---|---|
| **कुक्कुटपालन शेड** | रात्रीच्यावेळी पिल्लांचे आणि अंड्यांचे इतर प्राण्यांपासून संरक्षण होऊन उत्पन्नात वाढ करण्यासाठी अनुदान | • ग्रामीण भागात घरातच कुक्कुटपालन करणारी कुटुंबे | एका शेडसाठी (१०० पक्षांकरिता) अकुशल खर्च रु. ४,७६०/- व कुशल खर्च रु. ४५,०००/- असे एकूण रु.४९,७६०/-<br>लाभार्थ्याने पक्ष्यांची व्यवस्था स्वत: करणे अपेक्षित आहे. १०० पक्षी यशस्वीपणे सांभाळणाऱ्या लाभार्थ्याने पक्षांची संख्या १५०च्या वर नेल्यास मोठ्या शेडसाठी दुप्पट निधी उपलब्ध होतो. |
| **भू-संजीवनी नाडेप कम्पोस्टिंग** | शेतातील कचऱ्यावर कम्पोस्टिंगद्वारे प्रक्रिया करून जमिनीच्या आरोग्यात सुधारणा करून कृषी उत्पादनात वाढ करण्यासाठी अनुदान | • लाभार्थ्याकडे स्वत:ची जमीन असावी लागते. | नाडेपच्या एका युनिट करिता अकुशल खर्च रु. ४,०४६/- व कुशल खर्च रु. ६,४९१/- असे एकूण रु.१०,५३७/- |

## कागदपत्रे:

• आधार कार्ड, रेशन कार्ड, निवडणूक ओळखपत्र, उत्पन्नाचा दाखला, रहिवाशी दाखला, फोटो, विहित अर्ज नमुना

## अर्ज कुठे करावा?

मनरेगाच्या अंतर्गत काम करण्यासाठी अर्ज ग्राम पंचायत कार्यालयात करावा लागतो.




# राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना

**(संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ राज्य निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजना)**

महाराष्ट्रातील  सलग १५ वर्षांपासून महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असलेल्या दिव्यांग, दुर्धर आजार, निराधार, विधवा घटस्फोटित, परितक्त्या, देवदासी, अत्याचारित महिला, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची कुटुंब, अनाथ मुले (१८ वर्षाखालील) दारिद्र्य रेषेखालील यादीत समाविष्ट असणाऱ्या किंवा या यादीत समाविष्ट नसलेल्या परंतु ज्यांचे वार्षिक उत्पन्न रु. २१,०००/- हजारापेक्षा कमी आहे, तसेच ज्या दिव्यांगांचे वार्षिक उत्पन्न रु.५०,०००/- पर्यंत आहे; अशा सर्व कुटुंबांना आर्थिक सहाय्य देण्याच्या हेतूने केंद्र व राज्य पुरुस्कृत निवृत्तीवेतन योजना सुरुवात करण्यात आली आहे. सदरील योजनेमध्ये लाभार्थ्याची मुले २५ वर्षे इतकी होईपर्यंत किंवा नोकरी मिळेपर्यंत लाभार्थ्याला लाभ देण्यात येतो. परंतु ज्या लाभार्थ्याला फक्त मुलीच असतील अशा लाभार्थ्याच्या बाबतीत मुलीचे वय २५ वर्षे झाले अथवा त्यांना नोकरी लागली किंवा त्यांचे लग्न झाल्यास तरीसुद्धा लाभ सुरु राहतो.

शासनाच्या इतर अन्य कोणत्याही योजनेचा लाभ घेत असलेली व्यक्ती ह्या योजनेखाली लाभ मिळत नाही

## पात्रता:

| योजनेचे नाव | वय | इतर पात्रता |
|---|---|---|
| संजय गांधी निराधार योजना | वय १८ व ६५ वर्षापेक्षा कमी | दिव्यांग, दुर्धर आजार, निराधार, विधवा घटस्फोटित, परितक्त्या, देवदासी, अत्याचारित महिला, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची कुटुंब, अनाथ मुले (१८ वर्षाखालील) |
| श्रावणबाळ राज्य निवृत्तीवेतन योजना | व्यक्तीचे वय ६५ व ६५ वर्षांपेक्षा जास्त | दारिद्रय रेषेखालील यादीत समाविष्ट असणाऱ्या किंवा या यादीत समाविष्ट नसलेल्या परंतु ज्यांचे वार्षिक उत्पन्न रु. २१,०००/- हजारापेक्षा कमी आहे, तसेच ज्या दिव्यांगांचे वार्षिक उत्पन्न रु.५०,०००/- पर्यंत आहे; अशा सर्व कुटुंबांना या योजनेअंतर्गत लाभार्थी म्हणून गणले जाते. |
| इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ योजना | वय वर्षे ६५ ते ७९ | |
| इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती योजना | वय वर्ष ४० ते ७९ असणाऱ्या विधवा महिलां | दारिद्रय रेषेखालील यादीत समाविष्ट असणाऱ्या व वय वर्ष ४० ते ७९ असणाऱ्या विधवा महिलांना या योजनेचा लाभ मिळतो. |
| इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजना | १८ ते ७९ वर्षे या वयोगटातील अपंग व्यक्ती | दारिद्र्य रेषेखालील कुटुंबियांचा यादीत नाव असलेल्या १८ ते ७९ वर्षे या वयोगटातील अपंग व्यक्तीला इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्ती वेतन योजना मध्ये लाभ घेता येतो. |

## लाभ:

- अपत्य नसलेल्या लाभार्थ्यांना दरमहा रु. १०००/-  एक अपत्य असलेल्या लाभार्थ्यांना दरमहा रु. ११००/-  व दोन अपत्य व त्यापेक्षा अधिक आपण त्यास रु. १२००/- इतके अर्थसहाय्य दरमहा बँकेत किंवा पोस्टात जमा होते.

### योजना करिता लागणारी कागदपत्रे

विहित नमुन्यातील अर्ज, रेशनकार्ड, पतीचा मृत्यूचा दाखला, दिव्यांग असल्यास जिल्हा शल्य चिकित्सक यांचे दिव्यांग असल्याबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र किंवा दुर्धर आजार असल्याचा दाखला, मतदान कार्ड, ऑनलाईन उत्पन्नाचा दाखला, अर्जदार यांचा वयाचा दाखला किंवा मेडिकल सर्टिफिकेट, अर्जदार यांच्या मुलांच्या वयाचा दाखला, आधार कार्ड, बँक पासबुक, तलाठी पंचनामा, जबाब, अहवाल, स्वयं घोषणापत्र, फोटो

### अर्ज प्रक्रिया:

- सर्व कागदपत्रांची पूर्तता झालेल्या अर्जावर तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली समितीची दोन महिन्यातून एकदा बैठक होते. या समितीपुढे सादर करण्यात आलेल्या प्रत्येक अर्जाची चौकशी होऊन प्रकरण मंजूर किंवा नामंजूर केले जाते.

### योजनेसाठी अर्ज कुठे करावा?:

या योजनेचा पात्र लाभार्थ्यांकडून विनाशुल्क विहित नमुन्यातील अर्ज संजय गांधी योजना विभाग, तहसील कार्यालयात करावा. सद्या ह्या योजनेचे अर्ज महा ई सेवा केंद्रातून ऑनलाईन करावे लागते.

# महात्मा फुले जीवनदायी आरोग्य व प्रधानमंत्री आयुष्मान भारत योजना

राज्यातील जनतेला गंभीर आजारांवरील उपचारासाठी पूर्णपणे नि:शुल्क गुणवत्ता आरोग्य सुविधेचा लाभ देण्याकरिता महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत अंतर्गत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना एकत्रितपणे राबविण्यात येते.

## पात्रता

- **श्रेणी अ:** अन्न नागरी पुरवठा विभागाकडून वितरीत करण्यात आलेल्या पिवळ्या, अंत्योदय योजना, अन्नपूर्णा योजना व केशरी (रु.१ लाखापर्यंत वार्षिक उत्पन्न) शिधापत्रिका धारक कुटुंब
- **श्रेणी ब:** औरंगाबाद व अमरावती विभागातील सर्व जिल्हे तसेच नागपूर विभागातील वर्धा या शेतकरी अवर्षणग्रस्त जिल्ह्यातील शुभ्र शिधापत्रिका धारक शेतकरी कुटुंबे या योजनेचे लाभार्थी आहेत.
- **श्रेणी क:** शासकीय आश्रम शाळेतील विद्यार्थी, आश्रमातील महिला, शासकीय अनाथ आश्रमातील मुले, शासकीय वृद्धाश्रमातील जेष्ठ नागरिक, माहिती व जनसंपर्क कार्यालयाकडील निकषानुसार पत्रकार व त्यांची कुटुंबे तसेच कामगार विभागाने निश्चित केलेले बांधकाम व इतर बांधकाम कामगार व त्यांची कुटुंबे हे सुद्धा या योजनेचे लाभार्थी आहेत.

## लाभ - प्रती कुटुंब प्रती वर्षी आर्थिक मर्यादा

- महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत लाभार्थी कुटुंबाला प्रती वर्ष रु. १.५ लक्ष पर्यंत संरक्षण मिळते. मूत्रपिंड प्रत्यारोपणासाठी हि मर्यादा रु.२.५ लाखआहे.
- प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत प्रति कुटुंब प्रति वर्षी रु.५ लक्ष पर्यंत विमा विमा संरक्षण मिळते.

- या योजनेचा लाभ लाभार्थींना कुटुंबातील कोणत्याही एका व्यक्तीला किंवा अनेक व्यक्तींना घेता येतो.
  योजनेंतर्गत ३४ विशेष सेवांतर्गत ९९६ उपचार व शस्त्रक्रिया तसेच १२१ पाठपुरावा सेवांचा समावेश आहे. तर प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेंतर्गत १२०९ उपचार व १८३ पाठपुरावा सेवांचा समावेश आहे. ज्यामध्ये नि:शुल्क वैद्यकीय सेवा, रुग्णालयीन उपचार, निदानासाठी लागणाऱ्या चाचण्या, आवश्यक औषधोपचार, शुश्रुषा व भोजन आणि परतीचा प्रवास खर्च यांचा समावेश आहे. रुग्णालयातून रुग्णाची सुट्टी केल्यावर पाठपुरावा सेवा आणि १० दिवसांपर्यंत गुंतागुंत झाल्यास त्याचे मोफत उपचार समाविष्ट आहे.

## कागदपत्रे:

योजना पूर्णत: संगकीकृत असून लाभार्थी वैध शिधापत्रिका (पिवळी, अंत्योदय, अन्नपूर्णा व केशरी, अवर्षणग्रस्त जिल्ह्यातील शुभ्र शिधापत्रिका धारक शेतकरी) तसेच फोटो ओळखपत्राच्या आधारे अंगीकृत रुग्णालयातून मोफत उपचार घेऊ शकतात.

## अर्ज कुठे करावा?

- सर्व अंगीकृत रुग्णालयात आरोग्यमित्र उपलब्ध आहेत. आरोग्यमित्र रुग्णाची योजनेंतर्गत ऑनलाईन नोंदणी करतात तसेच रुग्णालयात उपचार घेताना योग्य ते सहाय्य व मदत करतात.
- रुग्ण नोंदणीच्या वेळी रुग्णाच्या नावाची पाडताळणी त्याचे ओळखपत्र पाहून केली जाते.





# प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण)

प्रधानमंत्री आवास योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असून ती स्वतंत्रपणे राबविली जाते. ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील बेघर/ कच्चेघर असलेल्या कुटूंबांना घरकुल बांधकामासाठी अर्थसहाय्य देणे हा योजनेचा उद्देश आहे. यातील घरकुले २५ वर्ग मीटर इतक्या क्षेत्रफळाची टिकाऊ व आपत्तीरोधक असतात.  घरकुलांच्या बांधकामकरिता पूर्वीची मदत रु.७०,००० ने वाढवून ती आता रु.१.२० लाख इतकी करण्यात आली आहे. तसेच टेकड्या/ दुर्गमभागातील घरासाठी रु.१.३० लाख इतकी करण्यात आली आहे.

## पात्रता

- कुटुंबातील कोणत्याही सदस्याच्या नावे पक्के घर नसावे. इतर कोणत्याही योजनेतून घरकुलाचा लाभ घेतलेला नसावा.
- आर्थिकदृष्ट्या दुर्बल व अल्प उत्पन असलेल्या कुटुंबाना लाभ देण्यात येतो.
- योजनेचा लाभ मिळण्यासाठी लाभार्थी दारिद्रय रेषेखालील असावा.
- घर कच्चे असावे. घरी इलेक्ट्रानिक वस्तू नसावी. टू व्हीलर व फोर व्हीलर नसावी.
- पती-पत्नीला एकच मुलगी आहे अशा कुटुंबासाठी प्राधान्याने लाभ देण्यात येतो.
- परितक्त्याआणि निराधार महिलांना प्राधान्याने लाभ देण्यात येतो.

## लाभ:

- सर्वसाधारण क्षेत्रातील लाभार्थ्यास रू.१.२० लक्ष
- नक्षलग्रस्त क्षेत्रातील लाभार्थ्यास रू.१.३० लक्ष
- घरकुल अनुदाना व्यतिरिक्त महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेअंतर्गत ९० ते ९५  दिवसांच्या अकुशल मुजूरीच्या स्वरूपात

अर्थसहाय्य दिले जाते.

- स्वच्छ भारत अभियानतंर्गत घरकुल लाभार्थ्यांना शौचालयासाठी स्वतंत्रपणे निधी दिला जातो.
- जर व्यक्ती भूमिहीन असेल तर त्या व्यक्तीला पंडित दीनदयाळ उपाध्याय योजनेतून आर्थिक मदत केली जाते.

**कागदपत्रे:**

- पॅन कार्ड, रेशन कार्ड,  मतदान ओळखपत्र, आधार कार्ड
- विधवा, परित्यक्ता, निराधार, असल्यास त्याबाबतचा पुरावा
- रहिवासी प्रमाणपत्र
- 7/12 उतारा व नमुना 8-अ (घराचा असेसमेंट / जागेचा सात बाराचा उतारा)
- शाळा सोडल्याचा दाखला/वयाचा दाखला
- जागा उपलब्धतेचे प्रमाणपत्र
- अर्जदाराचे नजिकच्या काळातील दोन पासपोर्ट साईज फोटो
- तहसिलदार यांचेकडून प्रमाणित उत्पन्नाचा दाखला
- ग्रामसभेचा ठराव

**योजनेसाठी अर्ज कुठे करावा?:**

- लाभार्थ्यांची निवड ग्रामपंचायतीमार्फत केली जाते. ग्रामपंचायतीमार्फत तयार केलेली कायम प्रतिक्षा यादी ग्रामपंचायतीच्या सुचना फलकावर प्रसिध्द केली जाते.
- सन २०११ च्या आर्थिक सामाजिक व जात सर्वेक्षणाची माहितीच्या आधारे सन २०१५-१६ पासून पुढील वर्षांसाठी लाभार्थ्यांची निवड केली जाते.
- वरील अटींची पुर्तता करणाऱ्या व कायम प्रतिक्षा यादीत समाविष्ट न झालेल्या कुटूंबांनी ग्रामपंचायतीचा ग्रामसेवक व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांच्यांशी संपर्क साधावा.



# शबरी आवास योजना (आदिवासी क्षेत्र)

आदिवासी उपयोजनेंतर्गत आदिवासी क्षेत्रात येणाऱ्या जिल्ह्यांतील अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांसाठी तसेच आदिवासी बाह्य क्षेत्रात येणाऱ्या जिल्ह्यांतील अनुसूचित जमातीच्या पात्र लाभार्थ्यांना घराचे २६९.०० चौ.फु. चटई क्षेत्र असलेले पक्के घरकुल उपलब्ध करून दिले जाते.

## पात्रता

- लाभार्थी महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमाती संवर्गातील असावा.
- लाभार्थ्यांचे महाराष्ट्र राज्यातील वास्तव्य किमान १५ वर्षांचे असावे.
- लाभार्थ्यांकडे स्वत:ची किंवा शासनाने दिलेली जमीन असणे आवश्यक असते.
- लाभार्थ्यांकडे स्वत:चे किंवा कुटुंबियांचे पक्के घर नसावे.
- विधवा, परित्यक्ता, निराधार, दुर्गम भागातील लाभार्थ्यांना प्राधान्य देण्यात येते.
- अर्जदाराच्या कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा खालीलप्रमाणे:
  अ) ग्रामीण क्षेत्र  रु. १ लाख
  ब) नगरपरिषद क्षेत्र रु. १.५० लाख
  क) महानगरपालिका क्षेत्र रु. २.०० लाख

## मिळणारा लाभ:

- घराच्या बांधकामासाठी क्षेत्रनिहाय कमाल खर्चाची मर्यादा पुढील प्रमाणे आहे.
  अ) ग्रामीण साधारण क्षेत्र: रु. १.३२ लाख
  ब) नक्षलग्रस्त व डोंगराळ क्षेत्रासाठी: रु. १.४२ लाख
  क) नगरपरिषद क्षेत्र: रु. १.५० लाख
  ड) महानगरपालिका क्षेत्र: रु. २.०० लाख
- घरकुल अनुदाना व्यतिरिक्त महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेअंतर्गत ९० ते ९५ दिवसांच्या अकुशल मुजूरीच्या स्वरूपात अर्थसहाय्य दिले जाते.
- स्वच्छ भारत अभियानतंर्गत घरकुल लाभार्थ्यांना शौचालयासाठी स्वतंत्रपणे निधी दिला जातो.
- बेघरांकडे स्वत:च्या: मालकीची जागा नसल्याने त्यांना घरकुलाचे लाभ देणे अशक्य होते. त्यासाठी केंद्र शासनाने “पंडित दिनदयाळ उपाध्याय जागा खरेदी” योजनेकरिता 50,000/- किंवा प्रत्यक्ष जमिनीची किंमत यांपैकी जी रक्कम कमी असेल ती या योजनेतुन मंजूर केली जाते.

## कागदपत्रे:

- पॅन कार्ड, रेशन कार्ड,  मतदान ओळखपत्र, आधार कार्ड
- विधवा, परित्यक्ता, निराधार, असल्यास त्याबाबतचा पुरावा
- रहिवासी प्रमाणपत्र
- 7/12 उतारा व नमुना 8-अ (घराचा असेसमेंट / जागेचा सात बाराचा उतारा)
- शाळा सोडल्याचा दाखला/वयाचा दाखला
- जागा उपलब्धतेचे प्रमाणपत्र
- अर्जदाराचे नजिकच्या काळातील दोन पासपोर्ट साईज फोटो

- तहसिलदार यांचेकडून प्रमाणित उत्पन्नाचा दाखला
- ग्रामसभेचा ठराव

## योजनेसाठी अर्ज कुठे करावा?:

- लाभार्थ्यांची निवड ग्रामपंचायतीमार्फत केली जाते. ग्रामपंचायतीमार्फत तयार केलेली कायम प्रतिक्षा यादी ग्रामपंचायतीच्या सुचना फलकावर प्रसिध्द केली जाते.
- सन २०११ च्या आर्थिक सामाजिक व जात सर्वेक्षणाच्या माहितीच्या आधारे सन २०१५-१६ पासून पुढील वर्षांसाठी लाभार्थ्यांची निवड केली जाते.
- वरील अटींची पुर्तता करणाऱ्या व कायम प्रतिक्षा यादीत समाविष्ट न झालेल्या कुटूंबांनी ग्रामपंचायतीचा ग्रामसेवक व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांचेशी संपर्क साधावा.




# प्रधानमंत्री किसान सन्मान निधी

शेतकऱ्यांना निश्चित उत्पन्न मिळण्याकरिता केंद्र शासना द्वारे प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पीएम-किसान) योजना सुरु करण्यात आली आहे. अल्प व अत्यल्प जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी १००% केंद्र पुरस्कृत योजना महाराष्ट्रात १ डिसेंबर २०१८ पासून राबविण्यात येत आहे.

## पात्रता

- सदर योजनेंतर्गत ज्या कुटुंबाचे (पती-पत्नी व त्यांचे 18 वर्षाखालील अपत्य) सर्व मिळून लागवडी लायक एकूण जमीन धारण क्षेत्र २ हेक्टरपर्यंत आहे, असे शेतकरी

  **योजनेचा लाभ मिळवण्यासाठी अपात्र व्यक्ती:** या योजनेत दोन हेक्टर पेक्षा जास्त जमीन धारण केलेल्या शेतकरी सहभागी होऊ शकत नाही.

- जमीन धारण करणारी संस्था.
- संवैधानिक पद धारण करणारे/ केलेले आजी व माजी व्यक्ती.
- आजी माजी मंत्री व राज्यमंत्री, आजी-माजी खासदार व राज्यसभा सदस्य, आजी-माजी विधानसभा विधानपरिषद सदस्य, आजी-माजी महानगरपालिकेचे महापौर, आजी-माजी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष
- केंद्र शासन, राज्य शासन व निमशासकीय संस्थांचे सर्व कार्यस्थ व निवृत्त अधिकारी, कर्मचारी तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नियामित अधिकारी व कर्मचारी (चतुर्थ श्रेणी/ गट-ड वर्गातील कर्मचारी)
- मागील वर्षात आयकर भरलेल्या व्यक्ती.

- निवृत्ती वेतनधारक ज्यांचे मासिक निवृत्तिवेतन रु. १० हजार किंवा त्यापेक्षा जास्त आहे.
- नोंदणीकृत व्यावसायिक डॉक्टर, वकील, अभियंता, सनदी लेखापाल (चार्टर्ड अकाउंटंट), वास्तुशास्त्रज्ञ, इत्यादी.

## लाभ:

- कुटुंबियांना रु. २०००/- प्रति हप्ता या प्रमाणे तीन हप्त्यात एकूण रु. ६०००/- प्रतिवर्षी लाभ मिळतो. या योजनेतील निधी थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केले जातात. खात्यात पैसे आल्याची माहिती मोबाईलवर मेसेजच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मिळते.

## कागदपत्रे

- आधार कार्ड, बँकखाते, शेतीचा सातबारा उतारा, शेतीचा आठ अ चा उतारा

## अर्ज कुठे करावा?

सर्व कागदपत्रांची पूर्तता करून तलाठी कडे अर्ज जमा करू शकता. सदरील योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्याला https://pmkisan.gov.in/ ह्या वेबसाईटवरून तसेच जवळच्या महा ई सेवा केंद्रावरसुद्धा ऑनलाईन अर्ज दाखल करू शकता.

# आत्मा-कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा

शेतकरी यांना विस्तार विषयक सेवा पुरविण्यासाठी आत्मा ही जिल्हास्तरावरील एक नोंदणीकृत स्वायत्त संस्था आहे. याबाबत शेतकऱ्यांची मते जाणून घेण्यासाठी जिल्ह्यातील शेतकरी सदस्य असलेली जिल्हास्तरीय शेतकरी सल्लागार समिती असते. जिल्ह्याचा धोरणात्मक संशोधन व विस्तार आराखडा तयार केला जातो. तालुका स्तरावर तालुका तंत्रज्ञान ज्यामध्ये कृषी व संलग्न विभागाचे तालुकास्तरीय अधिकारी असतात तसेच तालुका शेतकरी सल्लागार समिती ज्यामध्ये तालुक्यातील निवडक शेतकरी सदस्य असतात.

या दोन्ही समिती तालुक्याचा कृती आराखडा तयार करतात तसेच तालुक्यातील शेतकरी यांना विस्तार विषयक सेवा पुरवतात. गाव स्तरावर दोन गावांसाठी एक शेतकरी मित्र नेमण्यात येतो. हा शेतकरी मित्र म्हणजे विस्तार यंत्रणा व शेतकरी यांचेमधील एक दुवा असतो.

**पात्रता**

- शेतकऱ्याकडे स्वतःची शेतजमीन असावी.

**लाभ:**

१. शेतकरी प्रशिक्षण:
- आंतर राज्य शेतकरी प्रशिक्षण
- राज्यांतर्गत शेतकरी प्रशिक्षण
- जिल्हांतर्गत शेतकरी प्रशिक्षण

२. **प्रात्यक्षिके आयोजित करणे:**
   - कृषी विषयक प्रात्यक्षिके
   - कृषी संलग्न क्षेत्राची प्रात्यक्षिके:

३. **शेतकरी अभ्यास दौरे:**
   - आंतर राज्य अभ्यास दौरे
   - राज्यांतर्गत अभ्यास दौरे
   - जिल्हयांतर्गत अभ्यास दौरे

४. **गट निर्मिती मदत**

• शेती विषयक माहितीचा प्रसार: जिल्हा स्तरावर कृषी महोत्सव/ फळे फुले प्रदर्शनी

### कागदपत्रे

• आधार कार्ड, बँकखाते, शेतीचा सातबारा उतारा, शेतीचा आठ अ चा उतारा, शेतकरी असल्याचा दाखला

### अर्ज कुठे करावा?

तालुक्याच्या पातळीवरील कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा

# ऑनलाईन अर्ज करण्यासाठीची नोंदणीची प्रक्रिया

सर्वप्रथम https://aaplesarkar.mahaonline.gov.in ह्या वेबसाईट वर जाऊन नवीन नोंदणी ह्या ऑप्शन वर क्लिक करावे. त्यानंतर नोंदणीचे दोन प्रकार समोर दिसतील.

1. **आपल्या मोबाईल नंबर वर OTP द्वारे पडताळणी करून युजर आयडी आणि पासवर्ड बनवा.**
   पहिल्या ऑप्शन वर क्लिक केल्यावर नवीन विंडो सुरु होईल. त्यामध्ये आपला जिल्हा निवडून तुमचा आधार कार्ड ला जोडलेला मोबाईल नंबर टाकावा. त्यानंतर OTP पाठवा या ऑप्शन वर क्लिक करावे. त्यानंतर मोबाईल वर आलेला OTP टाकावा. आपल्याला हवा असलेला युजरनेम टाकावा. उदा. waghchetan. त्यानंतर आपल्याला हवा असलेला पासवर्ड टाकावा, व कॅन्फर्म पासवर्ड येथे सुद्धा परत तोच पासवर्ड टाकावा. इंग्रजीत व मराठी मध्ये संपूर्ण नाव टाईप करून जन्मतारीख घालावी व त्यानंतर नोंदणी करा या ऑप्शनवर क्लिक करावे. अशाप्रकारे तुमचे नावाची नोंद आपल्या सरकार सेवा केंद्र या वेबसाईटवर होते.

2. **स्वत:ची पूर्ण माहिती तसेच फोटो, ओळखीचा पुरावा व पत्याचा पुरावा अपलोड करून आणि आपल्या मोबाईल नंबर वर OTP द्वारे पडताळणी करून एकदाच स्वत:चे युजर प्रोफाईल बनवा**
   दुसऱ्या ऑप्शन वर क्लिक केल्यावर नवीन विंडो सुरु होईल. ह्या नवीन विंडो मध्ये अर्जदाराचे वैयक्तिक तपशील, अर्जदाराच्या निवासाचे तपशील, भ्रमणध्वनी क्रमांक आणि युजरनेम पडताळणी ह्याची माहिती टाईप करावे.

   त्यांनतर पुढीलप्रमाणे कागदपत्रे आपल्याला जोडावी लागतील ज्यामध्ये अलीकडील काढलेला फोटो, एक ओळखीचा पुरावा (फोटो

आयडी), पत्त्याचा  पुरावा इत्यादी कागदपत्रे अपलोड करावी. त्यानंतर नोंदणी करा या ऑप्शनवर क्लिक करावे. अशाप्रकारे तुमचे नावाची नोंद आपल्या सरकार सेवा केंद्र या वेबसाईटवर होते.

अशाप्रकारे नोंदणीची प्रक्रिया पूर्ण होऊन त्यामध्ये लाभार्थ्याचा USER ID व PASSWORD मिळतो तो सांभाळून ठेवावा. तसेच कोणत्या जिल्ह्यामध्ये युजर आयडी तयार केले आहे, तो जिल्हा सुद्धा लक्षात ठेवावा.

**योजनेसाठी ऑनलाईन अर्ज करण्याची पद्धत**

सर्वप्रथम https://aaplesarkar.mahaonline.gov.in/ ह्या वेबसाईट वर जाऊन नोंदणी केलेली आहे ? येथे लॉग इन करा यामध्ये तुम्ही तयार केलेला युजर आयडी व पासवर्ड टाकावा. तुम्ही नोंदणी करताना ज्या जिल्ह्याची नोंद केली होती, त्या जिल्ह्याची निवड करून समोर असलेला सेक्युरिटी कॅप्चा टाकून लॉगीन करावे.

लॉगीन झाल्यावर डाव्या बाजूला असलेला विभागातून आपल्याला ज्या विभागात अर्ज करावयाचा तो विभाग निवडावा. उदा. संजय गांधी योजनेसाठी, डाव्या बाजूला असलेल्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मध्ये जाऊन विशेष सहाय्य योजना ह्या ऑप्शन वर क्लिक करून त्यांनतर पुढे जा या ऑप्शन वर क्लिक करावे.

त्यानंतर नवीन विंडो ओपन होईल त्यामध्ये पुन्हा योग्य योजना निवडावी. निवडल्यानंतर योजनेसाठी लागणारी कागदपत्रांची यादी समोर येईल. ती यादी तपासून त्यामधील आवश्यक असलेल्या कागदपत्रांची तयारी करावी.

त्यानंतर पुन्हा पुढे जा या ऑप्शन वर क्लिक करावे, यामध्ये योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असणारा फॉर्म ऑनलाईन दिसेल. तो अर्ज संपूर्ण भरावा. अर्ज व्यवस्थित भरून झाल्यावर पुढे जा या ऑप्शन वर क्लिक करावे. त्यांनतर योग्य ती कागदपत्रे जोडून पुन्हा पुढे जा या ऑप्शन वर क्लिक करावे.

त्यांनतर तुम्हांला सदरील योजनेचा प्रक्रियेचे शुल्क ऑनलाईन डेबिट कार्ड/ UPI गुगल पे/ फोन पे/ PayTM द्वारे भरावे. पैसे भरल्यावर तुम्हाला पैसे भरल्याची पावती समोर येईल. ही पावती सेव्ह करून किंवा प्रिंट करून ठेवावी. व अर्जाची प्रिंट करून घ्यावी. अशा पद्धतीने तुमचा अर्ज भरला जातो. अशाच पद्धतीने इतर योजनेचे सुद्धा अर्ज तुम्हाला भरता येऊ शकेल!

अधिक माहितीसाठी https://aaplesarkar.mahaonline.gov.in/ ह्या वेबसाईट वेळोवेळी पहावी.





# युनिसेफ

युनिसेफ ही एक आंतरराष्ट्रीय संस्था असून बालहक्कांच्या संरक्षणासाठी ती सदैव कार्यरत आहे. जगभरातील बालके समान असून त्यांचे विविध अधिकार अबाधित राहावेत आणि त्यांचा विकास व्हावा, हे त्यांचे उद्दिष्ट राहिले आहे. जगभरातील मुले अजूनही विकासापासून वंचित आहेत. त्यांना त्यांच्या बालपणाचा आनंद प्राप्त व्हावा, तसेच त्यांच्या अधिकारांचे जतन व्हावे यासाठी योग्य त्या संरचना तयार करणे आणि जगभरातील देशांसोबत काम करत त्यातील बालक धोरणांमध्ये योग्य ते बदल घडवून आणणे, जेणेकरून बालकांसाठी आनंदमय आणि विकासाला पूरक वातावरण प्रत्येक बालकांना उपलब्ध होईल.

युनायटेड नेशन्स चिल्ड्रेन्स् फंड (युनिसेफ) हा युनायटेड नेशन्स (यूएन) या जागतिक संघटनेचा कार्यक्रम आहे. त्याचे सध्याचे मुख्यालय न्यूयॉर्क या शहरात आहे. युनिसेफ प्रामुख्याने विकसनशील देशांतील बालकांसाठी व मातांना मानवीय आणि विकासात्मक मदत पुरवते. दिनांक १९ डिसेंबर, १९४६ रोजी युनायटेड नेशन्स इंटरनॅशनल चिल्ड्रेन्स इमर्जन्सी फंडची निर्मिती करण्यात आली. संयुत्त राष्ट्रसंघाच्या जनरल असेंब्लीने दुसऱ्या जागतिक महायुद्धात उद्ध्वस्त झालेल्या बालकांना आणिबाणीच्या काळात अन्न आणि आरोग्य सेवा प्रदान करण्यासाठी मदत केली.

पोलिश देशातील फिजिशिएन लुडविक राजचमन यांना युनिसेफचे संस्थापक म्हणून ओळखले जाते. ते युनिसेफचे पहिले अध्यक्ष म्हणून सन १९४६ पासून काम केले आहे. डॉ. राजचमन यांनी दिलेल्या सूचनेनुसार अमेरिकेच्या मॉरिस पेट यांना १९४७ पासून १९६५ पर्यंत त्यांची पहिली कार्यकारी निदेशक म्हणून नियुक्त करण्यात आली. सन १९५० मध्ये सर्व देशांत विकसनशील देशांतील मुलांच्या व महिलांच्या दिर्घकालीन गरजा भागविण्यासाठी युनिसेफची कक्षा वाढविण्यात आली.

युनिसेफ हे सरकार आणि खाजगी दात्यांच्या सहयोगांवर अवलंबून आहे. संस्थेच्या संसाधनांमधील दोन तृतीयांश सरकारे योगदान करतात. खाजगी गट आणि व्यक्ती राष्ट्रीय समित्यांद्वारे उर्वरित योगदान देतात. युनिसेफच्या कार्यक्रमांमुळे मुलांच्या आरोग्य व कल्याणासाठी प्रोत्साहन देण्यासाठी समाजाची पातळी विकसित करण्यावर भर देण्यात आला आहे.

युनिसेफला १९६५ मध्ये नोबेल शांतता पुरस्कार आणि २००६ मध्ये प्रिन्स ऑफ अस्टुरियस ॲवॉर्ड ऑफ कॉनकॉर्ड पुरस्कार मिळाला आहे. १९० देश आणि प्रदेशांमध्ये युनिसेफचे बहुतेक कार्य आहे. जागतिक स्तरावरील मुलांमध्ये समानतेचा धागा पसरविण्यासाठी सदैव कार्यरत असलेले युनिसेफ मानवी विकासामध्ये महत्वाची भूमिका निभावत आहे.

जगातील १९० देश आणि प्रदेशातील बहुतेक कार्य क्षेत्रातात युनिसेफ कार्यरत असून आहे. एचआयव्ही, पौष्टिक पूरक आहार, आणिबाणीच्या काळात आश्रयस्थान, कुटुंब पुनर्मिलन, आणि शैक्षणिक पुरवठा अशा मुलांसाठी लहरी, प्रतिजैवक औषध बालकांच्या आणि महिलांच्या हक्काचे संरक्षण करणारे कार्यक्रम हा त्याचा मुख्य गाभा असतो. प्रत्येक देशाचे सरकार हे युनिसेफच्या कार्यक्रमाचे भाग असतात. या देशांना आवश्यकतेनुसार तांत्रिक मदत युनिसेफ करीत असतात.

# युवा

समाजाच्या व्यापक विकासाकरिता व बदलासाठी ना नफा-ना तोटा तत्वावर १९८४ सालापासून युवा एकता आणि स्वयंसेवी कृतीकरिता (युवा) कार्यरत आहे. सद्यस्थितीत युवा संस्था महाराष्ट्र, मध्य प्रदेश, ओडिशा, आसाम आणि नवी दिल्ली या राज्यात कार्यरत आहे.

विकासात्मक निर्णयातून वंचित राहिलेल्या पिडीत व शोषित समाजाच्या अधिकारांसाठी संघटित करण्यासाठी प्रोत्साहित करते, व समाजाच्या प्रश्नांवर एकत्रित येऊन त्यांच्या उत्थानासाठी धोरण वकिली आणि धोरणात्मक भूमिका सक्षम करण्यासाठी मदत करते.

त्याचबरोबरीने वंचित, दुर्बल घटकांचा लोकशाही पद्धतीने सहभागासाठी जनजागृती करणे, व त्यातून शोषित आणि पीडित घटकांचा विकासासाठी संस्थेने सातत्याने पुढाकार घेतला आहे.

आवास, उपजीविका , पर्यावरण आणि प्रशासन ह्या मुद्द्यांवर संशोधन, ज्ञान, क्षमतावृद्धि, आणि अभियानांमध्ये भागीदारी, हे संस्थेचे प्रमुख कार्य राहिले आहे.
कायदेसंबंधी ज्ञान, संशोधनं व अभ्यासांच्या माध्यमातून धोरणात्मक बदल सुचवणे ही संस्थेची विशेष पूरक भूमिका राहिली आहे.